03 OCT 2025 आरडॅर न्यू

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांनी संशोधनाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे : मंत्री पाटील



कोल्हापूर : विद्यापीठांनी आता संशोधनाकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देणे आवश्यक असून त्यासाठी त्यांना सर्वोतोपरी सहकार्य करण्याची शासनाची भूमिका आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या (वाय.सी.एस.आर.डी.) नूतन इमारतीच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी ते आज बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

मंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठ स्तरावर अध्यापनाबरोबरच प्राध्यापकांनी संशोधनाकडे लक्ष पुरविणे ही काळाची गरज आहे. शिवाजी विद्यापीठाचे वीस संशोधक जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांमध्ये स्थान मिळवून आहेत, ही अभिमानाची बाब आहे. ही संख्या अधिक वाढविण्यासाठी नव्या पिढीमध्ये संशोधनाची आस वाढविणे आवश्यक आहे. प्राध्यापकांना त्यासाठी प्रेरित करणेही गरजेचे असते, याचे भान शासनाला आहे. त्यामुळे संशोधनासाठी लागेल तितका निधी देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकासासाठीही मदत करण्यात येईल. पॉलिटेक्निक शैक्षणिक संस्थांच्या सर्वांगीण विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी देण्यामागे शासनाची हीच भूमिका आहे. आपल्याला व्यक्ती आणि समाज यांना आवश्यक भौतिक सुविधांच्या उपलब्धतेबरोबरच जीवन जगण्याची उत्तम पद्धती प्रदान कराव्या लागणार आहेत, जेणे करून चांगला माणूस घडेल. भारतीय ज्ञान परंपरेच्या अभ्यासक्रमाकडून आमची हीच अपेक्षा आहे. परकीय आक्रमकांनी इथली संस्कृती, कला आणि परंपरा पुसून टाकण्याचे काम केले. युरोपातील ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या परंपरेविषयी आपल्याला सांगितले जाते. तथापि, ऑक्सफर्डपूर्वी आपल्याकडे नालंदा विद्यापीठ होते. ऑक्सफर्डच्या काळातच तक्षशीला विद्यापीठ होते. या समृद्ध वारशाप्रती आपण सजग झाले पाहिजे. त्यासाठी आज इनोव्हेशन, पेटंट आणि रॉयल्टी या तिन्ही अंगांनी संशोधनाची कास पकडली पाहिजे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2025
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत बोलताना प्रा. अविनाश सप्रे. सोबत सुमित्रा जाधव, डॉ. जगदानंद भटकर, डॉ. रणधीर शिंदे आदी.

# मराठी विश्वकोशामुळे ज्ञानकोशाची समृद्धी

- प्रा. अविनाश सप्रे यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात मराठी विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

विश्वकोश भारतीय कोश परंपरेतील मुकुटमणी आहे. विश्वकोशाचा ज्ञानकोश समृद्धीत मोठा वाटा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी केले. महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ व शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

प्रा. सप्रे म्हणाले, ज्ञानभाषेच्या समृद्धीसाठी विश्वकोशाचे कार्य महत्त्वाचे असुन विश्वकोशाचे अद्यायवतीकरण झाले पाहिजे.

सुमित्रा जाधव यांनी 'नोंदलेखन करताना वापरावयाची संदर्भसाधने' विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. जगतानंद भटकर यांनी प्रत्यक्ष नोंदलेखन कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी कोशातील लेखनशैली, लेखनपरंपरा, नोंदीचे प्रकार, टप्पे सांगितले.

प्रा. डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, आजच्या युगात ज्ञानाचे भांडार हे विश्वकोशाच्या रूपात उपलब्ध आहे. अशावेळी गंभीरपणे लेखनासाठी ही कार्यशाळा उपयोगी पडेल.

प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. कार्यशाळेला वसंत गायकवाड, डॉ. संजय भुयेकर, मार्तेश हिरेमठ, प्रकाश दुकळे, सामंत सर, स्नेहा वाबळे, माधुरी नाखे, एकनाथ पाटील, श्यामसुंदर मिरजकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2025
सकाळ

# ज्ञानभाषेच्या समृद्धीसाठी विश्वकोशाचे कार्य महत्त्वाचे

## प्रा. अविनाश सप्रे; विद्यापीठातील नोंदलेखन कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १ : 'विश्वकोश भारतीय कोश परंपरेतील मुकुटमणी आहे. ज्ञानभाषेच्या समृद्धीसाठी विश्वकोशाचे कार्य महत्त्वाचे आहे,' असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी आज शिवाजी विद्यापीठात केले.

महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ आणि विद्यापीठातील मराठी अधिविभागातर्फे आयोजित मराठी विश्वकोश नोंदलेखन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी . ते बोलत होते. 'विश्वकोशाचा ज्ञानकोश समृद्धीत मोठा वाटा आहे. त्यासाठी विश्वकोशाचे अद्ययावतीकरण निरंतर होत राहिले पाहिजे', अशी अपेक्षा प्रा. सप्रे यांनी व्यक्त केली.

सुमित्रा जाधव यांनी, विश्वकोश नोंदलेखन आणि ज्ञानव्यवहार यामध्ये तथ्यांचा काटेकोर शोध महत्त्वाचा असल्याचे सांगितले. विश्वकोश निर्मिती मंडळातील विद्याव्यासंगी सहायक डॉ. जगतानंद भटकर यांनी प्रत्यक्ष नोंदलेखन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी वेगवेगळ्या कोशांची माहिती सांगून कोशातील लेखनशैलीची, लेखनपरंपरेची, नोंदीचे प्रकार, नोंदी करतानाचे टप्पे सांगितले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. 'आजच्या माहितीच्या युगात प्रमाणित ज्ञानाचे भांडार हे विश्वकोशाच्या रूपात आज उपलब्ध आहे. अशा काळात गंभीरपणे लेखन करण्यासाठी अशा कार्यशाळा निश्चितच उपयोगी पडतील', असे त्यांनी सांगितले. यावेळी वसंत गायकवाड, डॉ. संजय भुयेकर, मार्तंड हिरेमठ, प्रकाश दुकळे, स्नेहा वाबळे, माधुरी नाखे, एकनाथ पाटील, श्यामसुंदर मिरजकर आदी उपस्थित होते. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.



कार्यशाळेत बोलताना प्रा. अविनाश सप्रे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2025
सकाळ

# भगतसिंग यांच्या क्रांतिकार्यात मानवतेचे विचार : प्रतीक पाटोळे

## विद्यापीठातील इतिहास अधिविभागातर्फे व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : क्रांतिवीर शहीद भगतसिंग यांना घरातूनच क्रांतिकार्याचा वारसा लाभला. त्यांच्या क्रांतिकार्यात मानवतेचा विचारच अग्रणी होता, तो आपण समजून घेतला पाहिजे, असे प्रतिपादन युवा व्याख्याते प्रतीक पाटोळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे शहीद भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त पाटोळे यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील होते.

शहीद भगतसिंग यांनी ब्रिटिशांविरुद्ध लढताना फक्त क्रांतिकार्याचा विचार दिला नाही, तर मानवतेचा विचारही नवीन पिढीला दिला. आपल्यासारख्या तरुण विद्यार्थी, विद्यार्थिनींनी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, चंद्रशेखर आझाद यांसारख्या क्रांतिकारकांचे कार्य वाचून ते आत्मसात करावेत. हेच विचार आपल्याला आणि देशाला पुढे नेतील, असे श्री. पाटोळे यांनी सांगितले. भगतसिंग हे राष्ट्रीय विचारांचे होते. त्यांनी नेहमीच राष्ट्रीय विचार, मूल्यांना पाठिंबा दिला. देशातील सामान्यातील सामान्य लोकांचा विचार भगतसिंगांच्या मनी होता आणि हाच विचार तरुण पिढीने आत्मसात करावा, असे आवाहन डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

### क्रांती शब्दाला नवा आयाम दिला

भगतसिंगांनी क्रांती या शब्दाला एक नवा आयाम दिला. त्यांच्या क्रांतीमध्ये सर्वसमावेशक विचार होता. त्याद्वारे त्यांनी नव्या समाजनिर्मितीचे स्वप्न पाहिले होते. तरुणांचे संघटन करून त्यांनी त्यांच्यामध्ये क्रांतीचा विचार आणि बुद्धिप्रामाण्यवाद रुजविला. तरुणांनी हा विचार आत्मसात करून आपले व्यक्तिमत्त्व विचारशील करावे, असे आवाहन डॉ. पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2025
पुढारी

# विद्यापीठात प्राध्यापक-सहसंचालक संवाद कार्यक्रम उत्साहात

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ (ABRSM) व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'प्राध्यापकांचा शिक्षण सहसंचालकांशी संवाद' हा विशेष कार्यक्रम झाला.

यावेळी सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव यांनी उपस्थित शिक्षकांचे प्रश्न जाणून घेऊन त्यांना समाधानकारक उत्तरे दिली. अध्यक्षस्थानी डॉ. निखिल गायकवाड होते.

या प्रसंगी प्राध्यापकांनी आपल्या नोकरीसंदर्भातील विविध प्रश्न शिक्षण सहसंचालक डॉ. बच्छाव यांच्यासमोर मांडले. यावेळी ९० शिक्षक उपस्थित होते .

डॉ. बच्छाव यांनी पुढे कोणतेही काम प्रलंबित राहणार नाही. कार्यालयीन कारभार पूर्णतः स्वच्छ व पारदर्शक पद्धतीने पार पाडला जाईल. तसेच अशा बैठका दर दोन-तीन महिन्यांनी घ्याव्यात, पुढील बैठकीसाठी संबंधित अधिकारीही उपस्थित राहतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

या संवादादरम्यान कास्ट्राईब व सेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवरही चर्चा केली.

डॉ. आर. जी. पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शार्दुल सेलूकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शरद बनसोडे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमासाठी माजी आ. भगवानराव साळुंखे, सिद्धार्थ शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. राहुल माने, गुरुदत्त खानोलकर, अनिरुद्ध कोल्हापुरे, आनंद खामकर यांच्यासह पदाधिकारी, विविध अधिविभाग प्रमुख, सेवक संघाचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2025
पुढारी

# विद्यापीठामध्ये मागासवर्गीय उमेदवारांची नाव नोंदणी व महाविद्यालयस्तर स्थायी समिती पोर्टलचे लोकार्पण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कक्ष विभागामार्फत तयार करण्यात आलेल्या पोर्टलचे लोकार्पण कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. नेट, सेट, पीएच.डी. आर्हताधारक मागासवर्गीय उमेदवारांची नाव नोंदणी आणि मागासवर्गीय महाविद्यालयस्तर स्थायी समितीच्या कामकाजाची माहिती या सॉफ्टवेअर ॲप्लिकेशन पोर्टलच्या लिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची उपस्थिती होती. यावेळी विशेष कक्ष विभागाच्या उपकुलसचिव विभा अंत्रेडी, कायदा अधिकारी अनुष्का कदम, संगणक केंद्राचे प्रभारी संचालक अभिजित रेडेकर, उपकुलसचिव निवास माने, सहा. कुलसचिव वैशाली कुलकर्णी, आशिष घाटे यांच्यासह विशेष कक्ष आणि संगणक केंद्रातील प्रशासकीय सेवक उपस्थितीत होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 OCT 2025
पुढारी

# शिवरायांवरील अभ्यासक्रम विद्यापीठात सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभागातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज : जीवन व कार्य' असा ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यासाठी प्रवेश नोंदणीला उद्या, बुधवारपासून प्रारंभ होणार आहे. छत्रपती शिवरायांच्या जीवन व कार्यावर आधारित ऑनलाइन कोर्स तयार करण्यास विद्यापीठाकडून वारंवार दिरंगाई होत आहे. त्यामुळे आता संबंधित कोर्स सुरू होईपर्यंत दोन ऑक्टोबरपासून बेमुदत सत्याग्रह आंदोलन सुरू करणार असल्याचा इशारा अधिसभा सदस्य ॲड. अभिषेक मिठारी यांनी गेल्या आठवड्यात दिला होता. त्यानंतर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्याची कार्यवाही केली. पूर्णपणे ऑनलाइन, ई-कंटेट, ई-बुक्स स्वरूपातील संदर्भ साहित्य आणि ऑनलाइन परीक्षा व स्वाध्याय अशी या अभ्यासक्रमाची वैशिष्टे आहेत. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश नोंदणीसाठी ३० ऑक्टोबरपर्यंत मुदत आहे.